दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

साईबाबांच्या पादुकांचा बाहेरगावी दौरा साईभक्त व ग्रामस्थांमध्ये नाराजीचा सूर !

शिर्डी : गेल्या काही महिन्यांपासून साईबाबांच्या पादुका राज्यात व परराज्यात त्याच शहरात व त्याच मंदिरात घेऊन जाण्यास साई संस्थान प्रशासनाचा अट्टाहास का या मागचे गुपित अनेकांना कळले नसून साईबाबांच्या पादुका बाहेर गावी नेण्यास ग्रामस्थांचा व भक्तांचा विरोध असल्याची तीव्र भावना ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. पादुकांचा बाहेरगावी नेण्याच्या निर्णया विरोधात ७ वर्षापूर्वी प्रमोद गोंदकर, सर्जेराव कोते, सचिन शिंदे या ग्रामस्थांसह १२ ग्रामस्थांनी आमरण उपोषण केले होते परंतु ना. विखे पाटील यांनी मध्यस्थीती केल्याने ३ दिवसांनी ते उपोषण मागे घेण्यात आले होते.

विजयानंतर पंतप्रधान मोदींनी घेतली भारतीय क्रिकेट संघांची भेट

नवी दिल्ली : जपानमधील आयची-नागोया येथे नुकत्याच पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ (Asian Games 2026) मध्ये भारताच्या पुरुष आणि महिला क्रिकेट संघांनी सुवर्णपदक पटकावून क्रीडाविश्वात नवा इतिहास रचला आहे. या दोन्ही संघांच्या ऐतिहासिक विजयानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी, १५ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले आणि त्यांच्या या गौरवशाली कामगिरीचे भरभरून कौतुक केले.

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. १६ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १७५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

भीम ॲपवरुन तीन टप्प्यांत एनपीएस खाते उघडण्याची सुविधा

नाशिक : एनपीसीआय भीम सर्व्हिसेस लिमिटेडने भीम पेमेंट्स ॲपवर 'तत्काळ एनपीएस' सुविधा सुरू केली आहे. यामुळे पात्र वापरकर्त्यांना बँकेच्या शाखेत न जाता तीन सोप्या टप्प्यांत नॅशनल पेन्शन सिस्टीम (एनपीएस) खाते उघडता येणार आहे. ही सुविधा सध्या एसबीआय, एचडीएफसी, आयसीआयसीआय, ॲक्सिस, इंडसइंड आणि बँक ऑफ बडोदाच्या ग्राहकांसाठी उपलब्ध आहे. १८ ते ८५ वयोगटातील पात्र नागरिकांना किमान २५० रुपयांच्या सुरुवातीच्या योगदानातून खाते उघडता येईल. या सुविधेमुळे डिजिटल माध्यमातून निवृत्ती नियोजन करणे अधिक सोपे होणार आहे.

विवोचे ओरिजिनओएस 7 सादर

नवी दिल्ली: विवो इंडियाने आज आपली नवीनतम ऑपरेटिंग सिस्टीम, ओरिजिनओएस ७ सादर केली, जी सुधारित कार्यक्षमता, इंटेलिजेंट उत्पादकता आणि अखंड कनेक्टिव्हिटीद्वारे प्रीमियम स्मार्टफोनचा अनुभव वाढवण्यासाठी डिझाइन केली आहे. 'सोपे', 'स्मार्ट' आणि 'कनेक्टेड' या तीन मुख्य अनुभवांवर आधारित, ओरिजिनओएस ७ सुधारित सिस्टीम कार्यक्षमता, एआय-शक्तीवर चालणारी उत्पादकता, क्रॉस-डिव्हाइस कनेक्टिव्हिटी, पर्सनलायझेशन आणि वर्धित सुरक्षा एकत्र आणते, जेणेकरून वापरकर्त्यांना त्यांच्या विवो स्मार्टफोनचा अधिक चांगला वापर करता येईल.ओरिजिनओएस ७ दैनंदिन वापरासाठी अधिक मजबूत पायावर सुरू होते. ओरिजिन स्मूथ इंजिन, फ्लुइड मोशन आणि स्प्रिंग ॲनिमेशनसह एकत्रितपणे, संपूर्ण सिस्टीममध्ये अधिक प्रतिसादक्षमता आणि नैसर्गिक हालचाल प्रदान करते. फ्लुइड मोशन २०० हून अधिक परिस्थितींमध्ये द्रवासारखे गतिशील वर्तन आणते, तर स्प्रिंग ॲनिमेशन सिस्टीमचे घटक, ॲप्स आणि इन-पेज घटकांमध्ये वापरकर्त्याच्या इनपुटच्या गती आणि दिशेला नैसर्गिकरित्या प्रतिसाद देतात.

'रामायणम्'च्या दुसऱ्या खंडाचे मराठी भाषेत प्रकाशन

मुंबई: हार्परकॉलिन्स पब्लिशर्स इंडिया यांना दुश्यंत श्रीधर लिखित रामायणम् खंड 2 या पुस्तकाच्या प्रकाशनाची घोषणा करताना आनंद होत आहे. रामायण या कालातीत महाकाव्याची समृद्ध कथासंपदा, त्यातील गहन जीवनज्ञान आणि भारतीय संस्कृतीतील त्याचे चिरंतन महत्त्व या पुस्तकातून वाचकांसमोर उलगडणार आहे. भारतीय धर्मग्रंथ, संस्कृत साहित्य आणि भारतीय ज्ञानपरंपरेचा सखोल अभ्यास असलेले दुश्यंत श्रीधर हे आपल्या प्रभावी प्रवचनांसाठी, ओघवत्या कथाकथनशैलीसाठी आणि प्राचीन भारतीय ग्रंथांच्या अभ्यासपूर्ण विवेचनासाठी ओळखले जातात. त्यांच्या रामायणम् खंड 2 या पुस्तकातून रामायणातील व्यक्तिरेखा, त्यांचे आदर्श आणि जीवनमूल्ये नव्या दृष्टिकोनातून वाचकांसमोर येतात. सहजसुंदर ओघवत्या कथनशैलीतून आणि महाकाव्यातील आध्यात्मिक व तात्त्विक पैलूंच्या सखोल विवेचनातून हे पुस्तक वाचकांना धर्म, भक्ती, धैर्य आणि नीतिमत्ता या पिढ्यान्पिढ्या मार्गदर्शन करणाऱ्या शाश्वत मूल्यांचा नव्याने शोध घेण्यासाठी प्रेरित करते.

'केस नं. 99'चा थरारक ट्रेलर आणि पोस्टर प्रदर्शित

मुंबई : मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण करणारे अजय पुरकर आता दिग्दर्शनाच्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहेत. अजय पुरकर आणि सई अजय पुरकर दिग्दर्शित 'केस नं. ९९' या आगामी मराठी सस्पेन्स-थ्रिलरचा ट्रेलर आणि पोस्टर आज प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटातून दिग्दर्शनाच्या क्षेत्रात नवी वाटचाल सुरू करत अजय पुरकर यांनी एका रहस्यमय आणि उत्कंठावर्धक कथेला पडद्यावर मांडले आहे.



फर्दापूर ते तोंडापूर रस्ता कामाचा बोजवारा पाण्याविनाच निकृष्ट काम सुरु अधिकाऱ्यांची एसी केबिनमधील कुंभकर्णी झोप चव्हाट्यावर

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कानी

फर्दापूर ते तोंडापूर रस्त्याचे काम सध्या कागदावर जोरात सुरू असले तरी प्रत्यक्षात या कामाचा पुरता बोजवारा उडाला आहे रस्त्याच्या कामासाठी शासनाकडून लाखो करोडो रुपयांचा निधी खर्च केला जात असताना ठेकेदार आणि प्रशासनाच्या संगनमताने अत्यंत निकृष्ट दर्जाचे Third Class काम सुरू असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे रस्त्यावर केवळ खडी आणि माती टाकून त्यावर पाण्याचा एक थेंबही मारला जात नसल्याने हा रस्ता कितपत टिकणार असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे

पाण्याविना रस्ता कसा मजबूत होणार

रस्ते तयार करताना वाळू खडीवर पाण्याचे सिंचन करणे गरजेचे असते जेणेकरून माती व खडी एकत्र बसून रस्ता मजबूत होईल मात्र फर्दापूर ते तोंडापूर रस्त्याच्या कामात थेट खडीवर गोणपाटे टाकून केवळ देखावा केला जात असल्याचे दिसत आहे या रस्त्यावर पाण्याचा एक थेंबही मारला जात नसल्याचे उघड झाले आहे जर पायाभरणीच्या वेळीच पाणी मारले जात नसेल तर हा रस्ता काही दिवसांतच उखडून उध्वस्त होईल हे वेगळे सांगण्याची गरज नाही

अधिकारी एसी केबिनमध्ये झोपेत ठेकेदारांची चांदी

शासनाच्या तिजोरीतून कोट्यवधी रुपये खर्च करूनही जर रस्त्याची हीच गत होणार असेल तर या कामाची पाहणी करायला जाणारा कुणी वाली आहे का असा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे कामाचा दर्जा तपासण्याची तसदी न घेता केवळ वातानुकूलित AC केबिनमध्ये बसून ठेकेदारांची बिले कागदोपत्री पास करण्याचे उद्योग संबंधित अधिकारी करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. गोरगरीब जनतेच्या करातून जमा झालेल्या पैशांची उघडपणे उधळपट्टी सुरू असून थर्ड क्लास दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर आणि याकडे डोळेझाक करणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा सज्जड इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे

मनपा शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी वाचनालये सुरु करणार; आयुक्त अमोल येडगे यांची माहिती

वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तकदान पेटीचे उद्घाटन; डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने गुरुवारी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त खडकेश्वर येथील मनपा वाचनालयात अधिकारी व विभागप्रमुखांनी पुस्तकांचे वाचन केले. तसेच मनपा मुख्यालयात पुस्तकदान पेटीचे उद्घाटन करण्यात आले. महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी वाचनालये सुरू करण्याचा उपक्रम आयुक्त अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणार आहे.

खडकेश्वर येथील वाचनालयात सकाळी ९.३० ते ११ या वेळेत आयोजित कार्यक्रमाला आयुक्त अमोल येडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, मुख्य लेखापरीक्षक शिवाजी नाईकवाडे, उपआयुक्त अंकुश पांढरे, विकास नवाळे, सविता सोनवणे, अभय प्रामाणिक, कार्यकारी अभियंता मोहिनी वारभुवन, सांस्कृतिक अधिकारी सर्वेश नांद्रेकर, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी आयुक्तांच्या हस्ते वाचनालयाच्या जुन्या सभासदांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



यानंतर मनपा मुख्यालयात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्या ज्ञानात भर पडावी, या उद्देशाने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत नागरिकांना पुस्तके दान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुस्तकदान पेटीत जमा होणाऱ्या मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषांतील पुस्तकांचे वर्गीकरण करून ती मनपा शाळांमध्ये सुरू होणाऱ्या वाचनालयांना उपलब्ध करून दिली जाणार आहेत. मनपा अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त अमोल येडगे यांनी केले.

भीषण अपघात; चार जण गंभीर जखमी

फुलंब्री :जळगाव राष्ट्रीय महामार्गावरील राजूर रोड कोलते टाकळी येथील वळणावर सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे ५.५५ वाजण्याच्या सुमारास कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात एकाच कुटुंबातील चार जण गंभीर जखमी झाले. जखमींना रुग्णालयात दाखल केले.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर येथील टीव्ही सेंटर परिसरातील शेळके कुटुंब कारने प्रवास करत असताना राजूर रोड कोलते टाकळी येथील वळणावर चालकाला झोपेची डुलकी लागली. त्यामुळे कारवरील नियंत्रण सुटले. कार सुमारे २०० फूट अंतरापर्यंत घसरत गेली आणि तीन ते चार पलट्या घेत अपघात झाला. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले असून चारही प्रवासी गंभीर जखमी झाले.

एकाच कुटुंबातील चौघे जखमी : या अपघातात रूपाली गणेश शेळके (वय २८), गणेश सुभाष शेळके (वय ३८), सृष्टी गणेश शेळके (वय १०) आणि संचित गणेश शेळके (वय ६) हे जखमी झाले. अपघातग्रस्त कुटुंब छत्रपती संभाजीनगर शहरातील टीव्ही सेंटर परिसरातील रहिवासी असल्याची माहिती मिळाली आहे.

युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

वडोद बाजार पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद



छत्रपती संभाजीनगर : फुलंब्री तालुक्यातील बाबरा येथे गुरुवारी (दि. १५) दुपारी १२ वाजेच्या सुमारास गणेश महादू पवार (वय २२) या युवकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे बाबरा परिसरात शोककळा पसरली आहे.

घटनेची माहिती मिळताच नातेवाइकांनी वडोद बाजार पोलिसांना कळविले. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला.

गणेश पवार याने आत्महत्या का केली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी वडोद बाजार पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास सहायक फौजदार दयानंद वाघ करीत आहेत. युवकाच्या आकस्मिक मृत्यूमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

कळमनुरी तालुक्यात पत्नीचा खून करून पतीनेही संपवले जीवन

हिंगोली : कळमनुरी तालुक्यातील खरवड शिवारात पत्नीच्या माहेरी जाऊन बाजेच्या ठाव्याने गंभीर मारहाण करीत खून करणाऱ्या पतीने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली असून आत्महत्येपूर्वी त्याने सासूलाही मारहाण करीत गंभीर जखमी केले आहे. याप्रकरणी दि १५ ऑक्टोबर रोजी कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा झाला आहे. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार कळमनुरी तालुक्यातील खरवड येथील दिपाली पाईकराव यांचा विवाह काही वर्षापूर्वी धानोरा जहांगीर येथील विशाल डोंगरे याच्या सोबत झाला होता. विवाहानंतर काही दिवस चांगले वागविल्यानंतर विशाल याने दिपाली यांना त्रास देण्यास सुरूवात केली. त्यामुळे मागील काही दिवसांपासून त्या माहेरी खरवड येथे आई-वडीलांकडे राहण्यासाठी आल्या होत्या. बुधवारी दि १४ ऑक्टोबर रोजी पती विशाल हा त्याच्या सासुरवाडीला खरवड येथे गेला. यावेळी धरी त्याची पत्नी दिपाली व सासू कमलबाई या दोघीच होत्या. यावेळी विशाल व दिपाली यांच्यात वाद सुरू झाला.

शाब्दीक चकमकीनंतर विशालने तु माझ्या सोबत येण्याऐवजी माहेरी का आली या कारणावरून बाजेच्या लाकडी ठाव्याने मारहाण करण्यास सुरूवात केली. या मारहाणीत दिपाली यांचा मृत्यू झाला. तर सदर भांडण सोडवितांना सासू कमलबाई यांनाही मारहाण करून गंभीर जखमी केले. काहीवेळानंतर कमलबाई यांचे पती व मुलगा शेतात आल्यानंतर त्यांना हा प्रकार दिसून आला.

शिवछत्रपती महाविद्यालयात 'हसरी मैफिल'; हास्यकवी एन. अशोक यांच्या उपस्थितीत मानसिक आरोग्याचा जागर

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - अभ्यासाचा ताण, परीक्षेची चिंता आणि करिअरची धावपळ यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर वाढणारा ताण हलका करण्यासाठी शिवछत्रपती महाविद्यालयात हास्याची मैफिल रंगली. मानसिक आरोग्य सप्ताहानिमित्त आयोजित 'हसरी मैफिल' या कार्यक्रमातून हास्य, विनोद आणि सकारात्मक विचारांची महती विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आली.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवछत्रपती महाविद्यालयाच्या मानसशास्त्र आणि नाट्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (१५ ऑक्टोबर) सकाळी १२ वाजता एन-३, सिडको येथील राजमाता जिजाऊ सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. प्रसिद्ध हास्यकवी एन. अशोक यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

आजच्या स्पर्धात्मक वातावरणात विद्यार्थ्यांना अभ्यास, परीक्षा, करिअरविषयक अनिश्चितता आणि सामाजिक अपेक्षांचा सामना करावा लागतो. या धावपळीत मानसिक स्वास्थ्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. अशा वेळी मन प्रसन्न ठेवणे, भावनांना योग्य प्रकारे व्यक्त करणे आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासणे महत्त्वाचे ठरते. याच जाणिवेतून 'हसरी मैफिल'चे आयोजन करण्यात आले.



हास्य आणि विनोद हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून दैनंदिन जीवनातील ताण हलका करण्यासाठी आणि परस्परांतील संवाद अधिक आनंददायी बनविण्यासाठी उपयुक्त ठरतात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांचे भावनिक स्वास्थ्य, आत्मविश्वास आणि सामाजिक समायोजन यांनाही महत्त्व आहे. हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. डॉ. सी. एस. पाटील होत्या. अध्यक्षीय मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक यशाच्या ध्यासासोबतच मानसिक आरोग्याचीही काळजी घ्यावी, असे आवाहन केले. अभ्यासाबरोबर छंद, सांस्कृतिक उपक्रम आणि मनोरंजनालाही जीवनात स्थान दिल्यास दैनंदिन आव्हानांचा सामना सकारात्मकतेने करता येतो, असे त्यांनी नमूद केले.

मानसिक आरोग्याशी संबंधित अडचणी जाणवल्यास त्या मनात दडपून न ठेवता पालक, शिक्षक, समुपदेशक किंवा तज्ज्ञांशी संवाद साधणे आवश्यक आहे. निरोगी शरीरासोबत निरोगी मन जपण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी आणि मानसिक आरोग्याबाबत इतरांमध्येही जागरूकता निर्माण करावी, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला उपप्राचार्या डॉ. संगीता राजमाने, उपप्राचार्य प्रा. भरत वाहटुळे, पर्यवेक्षक डॉ. ए. एम. गवळी, पर्यवेक्षक प्रा. आर. व्ही. पाटील आणि प्रा. भारत शिरसाठ यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे हास्यकवी एन. अशोक यांचा परिचय नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. गहिनीनाथ वळेकर यांनी करून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. विश्वनाथ बोबडे यांनी केले. शेवटी नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थिनी वैष्णवी ढोणे यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड भोवली; परभणीतील डॉमिनोजवर कारवाई

सणासुदीच्या काळात अन्न व औषध प्रशासनाची धडक मोहीम; खाद्य व्यावसायिकांनो सावधान..! नियमभंग केल्यास परवाना होणार रद्द

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी- "सुरक्षित अन्न- निरोगी महाराष्ट्र"चे उद्दिष्ट डोळ्यठेऊन अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यातील सर्व खाद्य व्यवसाय चालकांसाठी व्यापक अन्न सुरक्षा अनुपालन आदेश काढले आहेत. या आदेशानुसार सर्व खाद्य व्यवसायांनी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत निर्धारित नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत दंडात्मक कारवाई, परवाना निलंबन अथवा रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येते.

दि. १३ ऑक्टोंबर रोजी विशेष मोहिमे अंतर्गत मे. जुबिलंट फूडवर्क्स लिमिटेड (डॉमिनोज पिझ्झा), येलदरकर कॉलनी, वसमत रोड, परभणी या आस्थापनेची तपासणी करण्यात आली असता सदर ठिकाणी अन्न सुरक्षा व मानदे (परवाना व नोंदणी) नियमन, २०११ मधील परिशिष्ट-४ मधील विविध तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले होते. जसे सदर ठिकाणी शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थ बनविण्याच्या ठिकाणी पार्टिशन नाही. कोल्डस्टोरमध्ये खराब झालेला कच्चा अन्न पदार्थ आढळला. नियमाप्रमाणे खाद्य पदार्थांचे कॅलरीबाबत/उष्मांका बाबत ग्राहकसाठी माहितीचे फलक लावलेले नव्हते. अन्न हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे योग्य ॲप्रन, हातमोजे, शू-कव्हर इत्यादी साधने (जिथे आवश्यक आहे तिथे) उपलब्ध नव्हते. अन्न व्यवसायाकडे ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करणारी प्रभावी यंत्रणा नाही. अन्न हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे अन्न सुरक्षितपणे हाताळण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये नाहीत किंवा त्यांना तसे प्रशिक्षण दिलेले नाही, इत्यादि.

त्यामुळे सदर पेढीचा परवाना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला. ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी वैभव ठोंबरे यांनी केली.

आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर खांदयतेल, खवा-मावा, मिठाई, मसाले इत्यादि अन्न पदार्थांची मागणी वाढत असते व अधिक नफा कमाविण्याच्या दृष्टीने काही उत्पादक/ विक्रेते अन्न पदार्थ अधिक आकर्षक दिसण्याकरिता ज्या अन्नपदार्थामध्ये खाद्यरंग वापरण्यास बंदी आहे त्यामध्ये त्याचा वापर व ज्या अन्नपदार्थांमध्ये खाद्यरंग वापरण्याची सूट आहे त्यामध्ये प्रमाणापेक्षा जास्त खाद्यरंग किंवा अखाद्यरंग वापरणे, कमी दर्जाचा कच्चा माल वापरणे इत्यादि गैरमार्गाचा अवलंब करण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अशा प्रवृत्तीवर अंकुश ठेवण्याकरिता व ग्राहकांना निर्भेळ, दर्जेदार आणि सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासनातर्फे विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व अन्न व्यावसाईक ज्यामध्ये खवा-मावा-मिठाई ईतर दूध व दुग्धजन्य पदार्थ उत्पादक/विक्रेते, रेस्टॉरेंट-फास्टफूड-चायनीज विक्रेते, खांदयतेल, मसाले व ईतर अन्नपदार्थ विक्रेते यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६ नियम व नियमन २०११ नुसार अन्न व्यवसाय करणे परवाना, नोंदणी घेऊनच व्यवसाय करावा.

आपल्या आस्थापनेत तयार होत असलेल्या किंवा विक्रीसाठी ठेवलेल्या अन्नपदार्थामध्ये अखाद्यरंग याचा वापर करण्यात येऊ नये तसेच खाद्यरंग व ईतर Food additives चा अन्नसुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदीनुसारच वापर करण्यात यावा.

दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, मिठाई इत्यादि नाशिवंत अन्न पदार्थांची साठवणूक योग्य तापमानावरच करावी. तसेच मुदतबाह्य, खाण्यासाठी अयोग्य अन्न पदार्थांची विक्री करू नये.

चहा व ईतर खाद्यपेय ग्राहकांना देण्याकरिता प्रतिबंधित सिंगल युज प्लास्टिकच्या कप, प्लेट ई. चा वापर करू नये. फक्त फूड ग्रेड प्लॅस्टिक च्या वस्तूंचा वापर करावा. वर्तमानपत्राच्या कागदामध्ये अन्न पदार्थ देऊ नये.

अन्नपदार्थ उत्पादन, वाटप, हाताळणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात यावी.

तसेच ग्राहकांना असे आवाहन करण्यात येते की, अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार नोंदवायची असल्यास टोल फ्री क्र. १८०० २२२ ३६५ तसेच https://complaints.mahafda.in या संकेतस्थळावर वर जाऊन आपली तक्रार नोंदवावी, असे आवाहन अन्न व औषधी विभागाचे सहाय्यक आयुक्त (अन्न) ए. ई. चौधरी यांनी केले आहे.



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

धर्मांतर, मागासलेपण आणि आरक्षणाची कायदेशीर चौकट

धर्मांतर केलेल्या व्यक्तीला पूर्वीच्या धर्मातील सामाजिक मागासलेपणाच्या आधारे आरक्षणाचा किंवा विशेष सवलतींचा दावा करता येणार नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. हिंदू धर्म सोडून इतर धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तीला पूर्वधर्मातील मागासलेपणाचा आधार घेत मागासवर्गीय दर्जा मिळवता येणार नाही, हे स्पष्ट करत न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आहे. हा निकाल केवळ एका विशिष्ट प्रकरणापुरता मर्यादित नसून, देशातील धर्मपरिवर्तन, सामाजिक सवलती आणि आरक्षणाच्या कायदेशीर निकषांवर एक व्यापक व स्पष्ट कायदेशीर चौकट प्रस्थापित करणारा ठरला आहे. या प्रकरणाच्या कायदेशीर भूमिकेचा विचार करता, न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, धर्मांतरानंतर जुन्या सामाजिक रचनेतील मागासलेपण आपोआप नव्या धर्मात कायम राहते असे गृहीत धरता येत नाही. संविधानाच्या अनुच्छेद २५ नुसार प्रत्येकाला आपला धर्म पाळण्याचा आणि प्रचार करण्याचा मूलभूत अधिकार आहे; परंतु 'धर्मस्वातंत्र्याचा अधिकार' आणि 'विशिष्ट मागास प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ मिळवण्याची पात्रता' हे दोन पूर्णपणे स्वतंत्र कायदेशीर मुद्दे आहेत. तमिळनाडो सरकारने २०१४ मध्ये काढलेला तो अध्यादेशही न्यायालयाने असंवैधानिक ठरवला, ज्याद्वारे धर्मांतरित व्यक्तींना मागासवर्गीय प्रमाणपत्र देण्याची तरतूद करण्यात आली होती. अशा निर्णयामुळे आवश्यक सामाजिक व कायदेशीर निकष बाजूला सारून आरक्षणाच्या मूळ संकल्पनेलाच धक्का बसू शकतो, हे न्यायालयाने अधोरेखित केले आहे. संविधानाच्या १९५० च्या अनुसूचित जाती आदेशानुसार हिंदू, बौद्ध किंवा शीख धर्माव्यतिरिक्त इतर धर्मांच्या लोकांना अनुसूचित जातीचा दर्जा दिला जाऊ शकत नाही, याची आठवणही न्यायालयाने करून दिली आहे. एखादी व्यक्ती जेव्हा स्वतःच्या इच्छेने मूळ धर्म सोडते, तेव्हा ती पूर्वधर्मातील जातीवर आधारित असलेल्या लाभांचा आणि आरक्षणाचा हक्क गमावते. हा निकाल भारताच्या आरक्षण व्यवस्थेतील सुस्पष्टता टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. आरक्षणाचा लाभ केवळ त्या घटकांना मिळायला हवा, जे प्रत्यक्ष आणि सातत्याने सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाचा सामना करत आहेत. या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर आता कायदेशीर अस्पष्टता दूर होईल आणि आरक्षणाच्या मूळ उद्देशाला न्याय मिळण्यास मदत होईल, यात शंका नाही.

राजकुंवर महाविद्यालयात डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी



फर्दापूर प्रतिनिधी : फर्दापूर दि. १५ ऑक्टोबर २०२६ राजकुंवर महाविद्यालय फर्दापूर येथे भारताचे माजी राष्ट्रपती ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि मिसाईल मॅन म्हणून जगप्रसिद्ध असलेले भारतरत्न डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांची जयंती अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा डॉ. ए जे बेडवाल हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जी एस पाटील उपस्थित होते डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी नेहमी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासावा मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती सत्यात उतरवण्यासाठी अहोरात्र मेहनत घ्यावी असा मोलाचा संदेश यावेळी देण्यात आला डॉ. कलाम यांनी विज्ञान तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रात दिलेल्या अमूल्य योगदानामुळे आणि तरुणांना प्रेरित करण्याच्या त्यांच्या देशव्यापी कार्यामुळे त्यांचे विचार आजही प्रत्येकासाठी दीपस्तंभ ठरतात त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवून विद्यार्थ्यांनी ज्ञान शिस्त कष्ट आणि देशसेवेची भावना आपल्या अंगी बाणवावी.असे या कार्यक्रमात आवर्जून सांगण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी ए पोळ मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन एम बी शिंदे मॅडम यांनी मानले या जयंती सोहळ्याला प्रा एस बी बिरहाडे एन एस शेळके सपकाळे मॅडम सोनवणे सर चव्हाण सर शेख सर राठोड सर मानकर मॅडम राऊत मॅडम सोनवणे मॅडम गव्हाणे मॅडम व राजपूत मॅडम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते राष्ट्रगीताने आणि डॉ. कलाम यांच्या अमर विचारांचे स्मरण करून कार्यक्रमाची सांगता झाली

मतदार यादीच्या एसआयआर कामकाजात गंगाखेड मतदारसंघ अव्वल

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कामकाजात गंगाखेड विधानसभा मतदारसंघाने ९६.४२ टक्के काम पूर्ण करत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तहसीलदार माधवराव बोथीकर, कैलास वाघमारे, उषाकिरण श्रगारे यांच्यासह सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, बीएलओ, पर्यवेक्षक, तलाठी, मंडळाधिकारी तसेच पोलीस पाटील, कोतवाल, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्या समन्वित प्रयत्नांतून हे यश साध्य झाले आहे. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे गंगाखेड मतदारसंघाने राज्यात अव्वल स्थान मिळविले असून, उर्वरित कामकाजही पूर्ण करण्यासाठी यंत्रणा कार्यरत आहे.

महिलांच्या नेतृत्वातून दुष्काळावर मात करण्याचा आशादायी मार्ग; SSP चा 'हवामानपूरक शेती' मॉडेल प्रभावी!

स्वयम् शिक्षण प्रयोग संस्थेच्या राज्यस्तरीय संवाद कार्यशाळेत सहा जिल्ह्यांतील 140 प्रतिनिधींचा सहभाग; जलव्यवस्थापन, अन्नसुरक्षा, चारा व्यवस्थापन आणि हवामान बदलावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन



छत्रपती संभाजीनगर, दि. १२ ऑक्टोबर २०२६ :** दुष्काळाच्या वाढत्या संकटावर मात करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजना पुरेशा नसून, लोकसहभाग, महिलांचे नेतृत्व, नैसर्गिक संसाधनांचे योग्य व्यवस्थापन आणि शासकीय योजनांचा प्रभावी वापर यांची सांगड घालणे आवश्यक आहे. महिला शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून राबविण्यात येणारे *महिला नेतृत्वाखालील हवामानपूरक शेती (Women-Led Climate-Resilient Farming)* हे प्रारूप दुष्काळाचा सामना करण्यासाठी प्रभावी आणि शाश्वत मार्ग ठरू शकते, असा महत्त्वपूर्ण संदेश स्वयम् शिक्षण प्रयोग (SSP) संस्थेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय संवाद कार्यशाळेतून देण्यात आला.

स्वयम् शिक्षण प्रयोग (SSP) आणि कृषी विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकसहभागातून दुष्काळावर मात : कृती आराखडा' या विषयावरील राज्यस्तरीय संवाद कार्यशाळा १२ ऑक्टोबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील कृषी विज्ञान केंद्रात आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत परभणी, नांदेड, लातूर, जालना, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या सहा जिल्ह्यांतील सुमारे १४० महिला शेतकरी, महिला गटांचे प्रतिनिधी, तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि SSP च्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

SSP च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नसीम मॅडम यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यशाळेत विविध जिल्ह्यांतील महिलांनी आपापल्या गावांमधील दुष्काळी परिस्थिती, शेतीसमोरील आव्हाने, पाणीटंचाई, अन्नसुरक्षा, पशुधन संवर्धन, चारा उपलब्धता, रोजगार आणि स्थलांतर यांसारख्या विषयांवर अनुभव मांडले. या अनुभवांच्या आधारे गावनिहाय गरजा ओळखून दुष्काळ निवारणासाठी कृती आराखडा तयार करण्यावर भर देण्यात आला.

'SSP च्या महिलांमध्ये ग्रामीण शाश्वत विकासासाठी आशेचा किरण'

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात MGM विद्यापीठाचे डॉ. रमेश जारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा जिल्ह्यांतील महिला गटांनी जिल्हानिहाय सादरीकरणे केली. या सादरीकरणांमधून ग्रामीण भागातील बदलती परिस्थिती, शेतीवरील हवामान बदलाचे परिणाम, पाण्याची उपलब्धता, पीकपद्धती, शेतीतील नुकसान आणि ग्रामीण कुटुंबांच्या उपजीविकेचे प्रश्न अधोरेखित झाले.

महिलांनी आपल्या गावांतील प्रत्यक्ष परिस्थिती मांडताना दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित नसून तो कुटुंबाचे उत्पन्न, अन्नाची उपलब्धता, पशुधनाचे संगोपन, रोजगार आणि स्थलांतर यांवरही होत असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे दुष्काळ निवारणासाठी प्रत्येक गावाची परिस्थिती लक्षात घेऊन स्थानिक पातळीवर उपाययोजना आखण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

या सादरीकरणांनंतर डॉ. रमेश जारे यांनी SSP च्या महिला गटांच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले, **"SSP च्या महिलांमध्ये एक आशेचा किरण दिसतो. महिलांची खूप मोठी चळवळ ग्रामीण शाश्वत विकासासाठी कार्यरत आहे."**

त्यांच्या या विधानातून ग्रामीण भागातील महिलांचे संघटन, त्यांच्यात विकसित होत असलेले नेतृत्व आणि शाश्वत ग्रामीण विकासासाठी त्या करीत असलेल्या सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित झाले. महिलांना केवळ लाभार्थी न मानता गावाच्या विकास प्रक्रियेतील नेतृत्वकर्त्या म्हणून संधी दिल्यास स्थानिक समस्यांवर प्रभावी उपाय शोधता येऊ शकतात, हा विचार या चर्चेतून पुढे आला.

सहा जिल्ह्यांतील महिलांनी मांडली गावांची दुष्काळी परिस्थिती

कार्यशाळेतील जिल्हानिहाय सादरीकरणे हे विशेष आकर्षण ठरले. परभणी, नांदेड, लातूर, जालना, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर येथील महिला गटांनी गावांची मूलभूत माहिती, शेतीची सद्यस्थिती, पाण्याची उपलब्धता, पीकनुकसान, चारा आणि पशुधन व्यवस्थापन, रोजगाराच्या संधी तसेच दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचा आढावा मांडला.

"पाणी व्यवस्थापन :" पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन आणि पाण्याच्या गरजांचे नियोजन हे दुष्काळ निवारणातील महत्त्वाचे घटक असल्याचे चर्चेतून स्पष्ट झाले. गावातील उपलब्ध पाणीसाठ्यांचे योग्य व्यवस्थापन, जलसंधारणाच्या उपाययोजना आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक कामांचे नियोजन करण्यावर भर देण्यात आला.

"शेती आणि पीकनुकसान :" अनियमित पाऊस, पाण्याची कमतरता आणि हवामानातील बदल यांचा शेतीवर होणारा परिणाम लक्षात घेऊन स्थानिक परिस्थितीला अनुरूप पीकपद्धती, मिश्रपीक पद्धती आणि हवामानपूरक शेती तंत्रांचा अवलंब करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

"अन्नसुरक्षा आणि पोषण :" दुष्काळाच्या काळात शेतीचे उत्पन्न कमी झाल्यास ग्रामीण कुटुंबांच्या अन्नसुरक्षेवर परिणाम होतो. त्यामुळे विविध पिकांची लागवड, घरगुती पोषणाची काळजी, स्थानिक अन्नस्रोतांचा वापर आणि कुटुंबांना वर्षभर पुरेल अशा अन्ननियोजनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

"चारा आणि पशुधन व्यवस्थापन :" ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नात पशुधनाचा महत्त्वाचा वाटा असतो. दुष्काळात चारा आणि पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने पशुपालकांसमोर गंभीर अडचणी निर्माण होतात. त्यामुळे चाऱ्याच्या गरजांचे पूर्वनियोजन, चारा उपलब्धतेसाठी स्थानिक उपाययोजना आणि पशुधन विभागाशी समन्वय साधण्याची आवश्यकता मांडण्यात आली.

"रोजगार, उत्पन्न आणि स्थलांतर :" शेतीतील अनिश्चिततेमुळे कुटुंबांच्या उत्पन्नावर परिणाम होतो आणि काही कुटुंबांना हंगामी स्थलांतर करावे लागते. या पार्श्वभूमीवर महिला उद्योजकता, शेतीपूरक व्यवसाय, पशुपालन आणि स्थानिक रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज चर्चेतून पुढे आली.

या सादरीकरणांमुळे विविध जिल्ह्यांतील महिलांना एकमेकांच्या अनुभवांतून शिकण्याची संधी मिळाली. गावातील समस्या ओळखण्यापासून ते उपाययोजनांना प्राधान्य देण्यापर्यंतच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे या वेळी अधोरेखित करण्यात आले.

ग्रामपंचायत विकास आराखड्यातून दुष्काळ निवारणाला चालना

दुसऱ्या सत्रात यशदाच्या देव मॅडम यांनी ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP), यशदा आणि जलव्यवस्थापन या विषयांवर मार्गदर्शन केले.

गावाच्या विकासासाठी उपलब्ध संसाधनांचे योग्य नियोजन, स्थानिक गरजांची ओळख आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून प्राधान्यक्रम निश्चित करण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. गावातील पाणीटंचाई, जलसंधारण, शेतीच्या गरजा आणि वंचित कुटुंबांच्या समस्या लक्षात घेऊन ग्रामपंचायत विकास आराखड्यात आवश्यक बाबींचा समावेश करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामसभा, ग्रामपंचायत, महिला गट आणि संबंधित शासकीय विभाग यांच्यात समन्वय वाढल्यास स्थानिक गरजांनुसार उपाययोजनांची आखणी करता येऊ शकते. गावातील महिलांनी आपले प्रश्न मांडून नियोजन प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, यावरही भर देण्यात आला.

SSP च्या महिला कार्यकर्त्यांच्या दूरदृष्टीचे कौतुक करताना देव मॅडम म्हणाल्या, **"SSP च्या महिला खूप डोळस आहेत. भविष्यातील गोष्टी बघण्याचा दृष्टिकोन त्यांच्यामध्ये आहे."**

महिलांना केवळ वर्तमानातील प्रश्नांची जाणीव नसून भविष्यात उद्भवू शकणाऱ्या आव्हानांचा विचार करून नियोजन करण्याची क्षमता आहे, हे त्यांच्या वक्तव्यातून अधोरेखित झाले. दुष्काळासारख्या संकटांना सामोरे जाण्यासाठी दूरदृष्टी, सामूहिक निर्णयक्षमता आणि दीर्घकालीन नियोजन महत्त्वाचे ठरते.

अन्नसुरक्षा टिकविण्यासाठी दीर्घकालीन नियोजन आवश्यक

कृषी विज्ञान केंद्राच्या डॉ. दीप्ती पाटगावकर यांनी अन्नसुरक्षेच्या विषयावर मार्गदर्शन केले. दुष्काळाच्या परिस्थितीत ग्रामीण कुटुंबांना पुरेसे आणि पौष्टिक अन्न उपलब्ध होण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शेतीतील उत्पादनातील घट, उत्पन्नातील अनिश्चितता आणि अन्नधान्याच्या उपलब्धतेतील अडचणी यांचा विचार करून स्थानिक पातळीवर अन्नसुरक्षेचे नियोजन करणे गरजेचे आहे. विविध पिकांचा अवलंब, स्थानिक अन्नपदार्थांची उपलब्धता आणि पोषणाला प्राधान्य देणाऱ्या शेती पद्धती ग्रामीण कुटुंबांची क्षमता वाढविण्यास मदत करू शकतात.

अन्नसुरक्षा ही केवळ अन्नधान्याच्या उत्पादनाशी संबंधित नसून त्याची उपलब्धता, कुटुंबांची आर्थिक क्षमता आणि पोषणमूल्ये यांच्याशीही निगडित आहे. त्यामुळे दुष्काळ निवारणाच्या कृती आराखड्यात अन्नसुरक्षा आणि पोषणाला महत्त्वाचे स्थान देण्याची आवश्यकता या सत्रातून अधोरेखित झाली.

चारा व्यवस्थापनातून पशुधनाचे संरक्षण

कृषी विज्ञान केंद्राच्या डॉ. जिंतूरकर मॅडम यांनी चारा व्यवस्थापन आणि पशुधन संवर्धन या विषयांवर मार्गदर्शन केले.

दुष्काळाच्या काळात चारा आणि पाण्याची उपलब्धता कमी झाल्यामुळे जनावरांचे आरोग्य, दूध उत्पादन आणि पशुपालकांचे उत्पन्न प्रभावित होऊ शकते. अशा परिस्थितीत चाऱ्याची गरज आधीच ओळखणे, उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करणे आणि संबंधित शासकीय विभागांशी समन्वय साधणे आवश्यक आहे.

गावनिहाय चारा उपलब्धतेचा आढावा घेणे, पशुधन असलेल्या गरजू कुटुंबांची ओळख करणे आणि उपलब्ध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे या बाबींवर चर्चा करण्यात आली. पशुधनाचे संरक्षण म्हणजे ग्रामीण कुटुंबांच्या उपजीविकेचे संरक्षण असल्याने दुष्काळ व्यवस्थापनात या घटकाकडे विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी शासकीय योजनांचा प्रभावी वापर

पोकरा विभागाचे विशाल साळवे यांनी हवामान बदल आणि पोकरा योजनेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात राबविता येणाऱ्या उपाययोजनांवर मार्गदर्शन केले.

बदलते पर्जन्यमान, वाढती हवामानविषयक अनिश्चितता आणि शेतीसमोरील नवे धोके लक्षात घेऊन शेतकऱ्यांची अनुकूलन क्षमता वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक परिस्थितीला अनुरूप कृषी हस्तक्षेपांची निवड, उपलब्ध शासकीय योजनांची माहिती आणि पात्र शेतकऱ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविणे यांचे महत्त्व या सत्रात अधोरेखित झाले.

हवामानपूरक शेती पद्धती, जलव्यवस्थापन आणि शाश्वत कृषी तंत्रांचा अवलंब करण्यासाठी शेतकरी, महिला गट, सामाजिक संस्था आणि शासकीय विभागांनी समन्वयाने काम करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

महिलांच्या नेतृत्वाखालील हवामानपूरक शेती हा दुष्काळ निवारणाचा एकात्मिक मार्ग

कार्यशाळेतील चर्चांमध्ये महिला नेतृत्वाखालील हवामानपूरक शेती प्रारूपाचे महत्त्व विशेषत्वाने पुढे आले. या प्रारूपात शेती, पाणी, अन्नसुरक्षा, पशुधन आणि उपजीविका या सर्व घटकांचा एकत्रित विचार केला जातो.

महिला शेतकऱ्यांना हवामानपूरक शेती पद्धतींचे प्रशिक्षण देणे, मिश्रपीक पद्धतीला प्रोत्साहन देणे, शेतीतील निविष्ठांचा कार्यक्षम वापर करणे, जलसंधारणाच्या उपक्रमांमध्ये सहभाग वाढविणे आणि महिला उद्योजकतेला चालना देणे यांमधून ग्रामीण कुटुंबांची संकटांना सामोरे जाण्याची क्षमता बळकट होऊ शकते.

SSP च्या माध्यमातून महिला शेतकरी, सखी आणि गावपातळीवरील महिला गट यांना एकत्र आणून स्थानिक प्रश्नांची ओळख, सामूहिक निर्णयप्रक्रिया आणि शासकीय योजनांशी जोडणी यांना चालना दिली जाते. दुष्काळाच्या परिस्थितीतही या प्रकारचे संघटन गावातील गरजू कुटुंबांच्या समस्या समजून घेण्यासाठी आणि उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी महत्त्वाचे ठरू शकते.

ग्रामीण शाश्वत विकासासाठी महिलांची सामूहिक चळवळ

या राज्यस्तरीय संवाद कार्यशाळेतून ग्रामीण भागातील दुष्काळी परिस्थिती समजून घेण्याबरोबरच महिलांच्या नेतृत्वाखाली उपाययोजना विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण विचारमंथन झाले. सहा जिल्ह्यांतील महिला गटांचे अनुभव, विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि SSP च्या टीमचा सहभाग यामुळे दुष्काळ निवारणाकडे एकात्मिक दृष्टिकोनातून पाहण्याची संधी उपलब्ध झाली.

या कार्यशाळेत स्वयम् शिक्षण प्रयोग संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नसीम मॅडम, MGM विद्यापीठाचे डॉ. रमेश जारे, यशदाच्या देव मॅडम, कृषी विज्ञान केंद्राच्या डॉ. दीप्ती पाटगावकर व डॉ. जिंतूरकर मॅडम, पोकरा विभागाचे विशाल साळवे, तसेच SSP च्या देवकन्या जगदाळे, लीला जाधव, सम्राट कसबे, वैशाली घुगे यांच्यासह विविध जिल्ह्यांतील महिला गटांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

"महिलांचे नेतृत्व, लोकसहभाग आणि उपलब्ध संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन यांच्या माध्यमातून दुष्काळावर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना उभ्या करता येऊ शकतात," हा या कार्यशाळेचा महत्त्वपूर्ण संदेश ठरला.

दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी प्रत्येक गावाने स्वतःच्या गरजा ओळखून सामूहिक कृती आराखडा तयार करणे, महिलांना निर्णयप्रक्रियेत अग्रस्थान देणे आणि शासकीय यंत्रणा व सामाजिक संस्थांमध्ये समन्वय वाढविणे ही काळाची गरज आहे. महिला नेतृत्वाखालील हवामानपूरक शेतीच्या माध्यमातून ग्रामीण समुदाय अधिक सक्षम, स्वावलंबी आणि हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज होऊ शकतात, असा आशावाद या राज्यस्तरीय संवादातून व्यक्त करण्यात आला.

माणगांव येथे "सेवा संकल्प अभियान" उत्साहात संपन्न; 453 लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा थेट लाभ

पालकमंत्री नामदार भरतशेठ गोगावले आणि नामदार अदिती ताई तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभहस्ते कार्यक्रमाचे उदघाटन







बोरघर,माणगांव -रायगड : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील 25 वर्षांच्या यशस्वी कारकिर्दी निमित्त "सेवा परमो धर्म " या उक्तीप्रमाणे शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या 9 सप्टेंबर 2026 च्या शासन निर्णयानुसार राज्यभरात "सेवा संकल्प अभियान" राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत गुरुवार, दिनांक 15 ऑक्टोबर 2026 रोजी माणगांव येथील मध्यवर्ती प्रशासकीय भवन, तहसील कार्यालयाच्या सभागृहात "सेवा संकल्प अभियान शिबिर" अत्यंत उत्साहात पार पडले.

सदर शिबिराचे उदघाटन रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. भरतशेठ विठाबाई मारुती गोगावले (मंत्री, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास) आणि महिला व बालविकास मंत्री मा. ना. कु. आदितीताई वरदा सुनिल तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभहस्ते झाले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार श्री. विपीन लोकरे यांनी केले. व्यासपीठावर उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप, नगराध्यक्ष, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

453 लाभार्थ्यांना लाभ वाटप:

या शिबिराच्या माध्यमातून माणगांव तालुक्यातील विविध विभागांशी संबंधित एकूण 453 लाभार्थ्यांना प्रत्यक्ष योजनांचे लाभ व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यापैकी 88 लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात दोन्ही मंत्री महोदयांच्या हस्ते थेट लाभ प्रदान करण्यात आला.

विभागनिहाय लाभाचा तपशील:

- ***महसूल विभाग (236 लाभार्थी):*** नॉन-क्रिमीलेअर 41, जातीचा दाखला २७, उत्पन्नाचा दाखला 33, डोमिसाईल 11, गाव नमुना 7/12 व 12 ई 2, जिवंत 7/12 - 64, विलंबाने जन्म-मृत्यू नोंद 13, वनपट्टेधारक 7/12 - 2, शिधापत्रिका 40.

- ***नगरपंचायत (115 लाभार्थी):*** सर्वांसाठी घरे अंतर्गत अतिक्रमण नियमन सनद 18, प्रधानमंत्री आवास शहरी-2.0 - 35, शबरी आदिवासी घरकुल 37, जन्म-मृत्यू सनद 15.

- ***महिला व बालविकास, आरोग्य, कृषी व इतर:*** लेक लाडकी योजना, मातृवंदना, बेबी केअर किट, दिव्यांग प्रमाणपत्र 11, विवाह नोंदणी, कर आकारणी उतारा 17, महिला शेतकरी प्रमाणपत्र 28, ट्रॅक्टर अनुदान, आयुष्मान भारत कार्ड 20, NCMC कार्ड 20 आदी लाभांचे वाटप झाले.

या प्रसंगी मंत्री आदिती तटकरे आणि पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गट विकास अधिकारी, माणगांव यांनी मानले.

हा कार्यक्रम जिल्हाधिकारी मा. श्री. किशन जावळे (भा. प्र.से.), अपर जिल्हाधिकारी सचिन ढोले आणि उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. शासकीय योजनांचा लाभ थेट आणि जलद गतीने नागरिकांपर्यंत पोहोचवणे हाच या अभियानाचा मुख्य उद्देश असून, या भव्य शिबिरास नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन



हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बारव अभ्यासक रोहन काळे, जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे, नायब तहसीलदार प्रमोद वाकोडकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पवन खांडके, आयटीआयचे प्राचार्य विकास आडे, मल्हारीकांत देशमुख यांच्यासह अधिकारी-कर्मचारी, बारव अभ्यासक आणि वारसादूत उपस्थित होते.

जात वैधता प्रमाणपत्र अर्जाची ऑनलाइन सद्यस्थिती तपासून घ्या

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज केलेल्या अर्जदारांनी सद्यस्थिती अधिकृत संकेतस्थळावर लॉगिन करून तपासावी. आता अर्ज प्रक्रियेचे कामकाज ऑनलाइन व पेपरलेस पद्धतीने होत असल्याने अर्जदारांनी केवळ अर्जाची स्थिती जाणून घेण्यासाठी किंवा त्रुटीपूर्तता करण्यासाठी समिती कार्यालयात प्रत्यक्ष येणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अर्जदारांनी अधिकृत संकेतस्थळावरून जात वैधता प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज सादर केला आहे, त्याच संकेतस्थळावर लॉगिन करून आपल्या प्रकरणाची सद्यस्थिती नियमितपणे तपासावी. अर्जामध्ये काही त्रुटी असल्यास किंवा अतिरिक्त कागदपत्रे व पुरावे सादर करण्याबाबत समितीकडून सूचना देण्यात आल्या असल्यास, संकेतस्थळावर उपलब्ध सुविधेचा वापर करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत व विहित वेळेत त्रुटींची पूर्तता करावी.

तसेच प्रकरणाच्या अनुषंगाने समितीकडून देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. सुनावणीसाठी उपस्थिती किंवा अन्य कार्यवाही करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्यास त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी. ऑनलाइन प्रणालीचा प्रभावीपणे वापर केल्यास अर्जदारांना आपल्या प्रकरणाची माहिती मिळविणे आणि आवश्यक कागदपत्रे सादर करणे सुलभ होणार आहे. त्यामुळे सर्व संबंधित अर्जदारांनी अर्जाची सद्यस्थिती नियमितपणे तपासून आवश्यक कार्यवाही वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष पांडूरंग बोरगावकर, उपायुक्त तथा समिती सदस्य पी. जी. कुलकर्णी यांनी केले आहे.

आ.विटेकर यांचे नी.पो.आ.पांडुरंग रणखांब यांच्या हस्ते स्वागत



हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : आमदार राजेश विटेकर यांचे स्वागत क्रांतिवीर लहुजी साळवे शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा निवृत्त पोलीस अधिकारी पांडुरंग रणखांब यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी सरपंच दिगंबरराव भिसे अण्णा पत्रकार सलीम इनामदार भाजप शक्ती प्रमुख दीपक गवारे यांची उपस्थिती होती

सेवा संकल्प अभियानातून विद्यार्थिनीच्या तिरळेपणावर यशस्वी शस्त्रक्रिया

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : सेवा संकल्प अभियानांतर्गत फुलंब्री तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा हिवरा, बाबरा येथील कु. श्रेया विकास वाघ या विद्यार्थिनीच्या तिरळेपणावर (स्क्विंट) १४ ऑक्टोबर रोजी यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत दहिफळे हॉस्पिटल येथे ही शस्त्रक्रिया पार पडली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनीची तपासणी करून आवश्यक उपचार करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. इंदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पूर्ण झाली. यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे जिल्हा कार्यक्रम समन्वयक श्री. मेश्राम, जिल्हा कार्यक्रम सहाय्यक श्री. कैलास आणि दहिफळे हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाने सहकार्य केले. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत बालकांमधील आरोग्यविषयक समस्या लवकर ओळखून त्यांना तपासणी, उपचार आणि शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. सेवा संकल्प अभियानातून गरजू बालकांना वेळेत दर्जेदार आरोग्यसेवा मिळवून देण्यासाठी आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे.

पेमेंट ॲप्स भारतातील व्यक्तीचे आर्थिक सोबती बनले

बेंगळुरू: पहले इंडिया फाउंडेशनने आज ॲमेझॉन पेसोबत सहयोगाने 'हाऊ अर्बन इंडिया पेज रिपोर्ट २०२६' प्रसिद्ध केला. २० राज्यांमधील १०० शहरांतील ५,१४९ ग्राहक आणि १,०५४ व्यापाऱ्यांच्या सर्वेक्षणावर आधारित या अहवालातून निदर्शनास आले आहे की, डिजिटल पेमेंट्स दैनंदिन सवय बनली आहे आणि खर्चाच्या सहापैकी पाच श्रेणींमध्ये यूपीआय आघाडीवर आहे. भारतातील शहरी भागामधील चारपैकी तीन (७५ टक्के) व्यक्तींनी त्यांच्या पेमेंट ॲपमध्ये किमान एका आर्थिक उत्पादनाचा वापर केला आहे. पण हा आत्मविश्वास डिजिटल क्रेडिटच्या बाबतीत तेवढ्याच प्रमाणात विस्तारलेला नाही, जिथे जागरूकता जास्त (८८ टक्के) असली तरी प्रत्यक्ष वापराचे प्रमाण कमी (३१ टक्के) आहे.ही तफावत मोजण्यासाठी अहवालात डिजिटल क्रेडिट इन्क्लुजन इंडेक्स (डीसीआयआय) २०२६ सादर करण्यात आला आहे, जो देशाच्या डिजिटल क्रेडिट प्रवासाचा सर्वसमावेशक दृष्टिकोन मांडणारा भारताचा पहिला संमिश्र बेंचमार्क आहे. हा निर्देशांक भारताला १०० पैकी ५५.८५ एकूण स्कोअर देतो, ज्यामुळे भारत "इमर्जिंग अँड सव्हर्ड" (५१ ते ७५) श्रेणीत येतो.

जिल्ह्यात 'जागतिक हात धुवा दिन' उत्साहात साजरा

जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या आवाहनाला प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : जागतिक हात धुवा दिनानिमित्त जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केलेल्या आवाहनाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे तसेच पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये हात धुण्याचे प्रात्यक्षिक आणि स्वच्छतेची शपथ घेऊन हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी जागतिक हात धुवा दिन साजरा केला जातो. २००८ पासून या दिवसाच्या माध्यमातून हातांच्या स्वच्छतेचे महत्त्व आणि आरोग्याच्या दृष्टीने योग्य पद्धतीने हात धुण्याची सवय याबाबत जनजागृती केली जाते. यंदा 'बी अ हँडवॉशिंग हिरो' अर्थात 'हात धुण्याचा नायक व्हा', ही संकल्पना राबविण्यात आली.

या उपक्रमांतर्गत हात कधी आणि कसे धुवावेत, याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले. विशेषतः शालेय विद्यार्थी आणि अंगणवाडीतील बालकांमध्ये हातांच्या स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल, बांधकाम सभापती सचिन गरड, समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के, आरोग्य व शिक्षण सभापती अनिताताई ज्ञानेश्वर मोठे, महिला व बालकल्याण सभापती मीनाक्षीताई किशोर पवार तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनीही या उपक्रमासाठी आवाहन केले होते.

पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे आणि पाणी व स्वच्छता विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी साहेबराव चव्हाण यांच्या समन्वयातून ही मोहीम राबविण्यात आली. तालुका स्तरावर गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी आणि महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी पुढाकार घेत मोहीम यशस्वी केली.

विद्यार्थिनींना मिळाले पाणी नमुने तपासणीचे धडे

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी**जल जीवन मिशनच्या पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम अंतर्गत नागरिकांमध्ये स्वच्छ आणि शुध्द पाण्याचे महत्व वाढवण्यासाठी तसेच अशुद्ध पाण्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विदयार्थ्यांना पाणी तपासणी प्रयोगशाळांची ओळख निर्माण व्हावी तसेच शुध्द आणि पिण्याच्या पाण्याचे महत्व विदयार्थ्यांना लक्षात यावे यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाच्या पाणी तपासणी प्रयोगशाळामध्ये शालेय विदयार्थ्यांना पाणी नमुने तपासणीचे धडे मिळाले.

बुधवार दि 14 ऑक्टोबर 2026 रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक जयंत गाढे, वरिष्ठ भू - वैज्ञानिक चक्रधर चव्हाण यांच्या सनियंत्रणात शहरातील भारतीय बालविद्या मंदिर माध्यमिक शाळेतील विद्यार्थिनींनी परभणी येथील पाणी नमुने तपासणी प्रयोगशाळेला भेट दिली. यावेळी प्रयोगशाळेची संरचना, पाणी तपासणी कशी केली जाते तसेच पाण्याला अशुद्ध करणारे विविध घटक तसेच पाणी अशुद्ध होण्याची कारणे इत्यादी बाबत सविस्तर माहिती घेतली.

यावेळी रसायनी सुनील एस.के, पाणी गुणवत्ता तज्ञ अविनाश आरळकर, जिल्हास्तर नियंत्रण रसायनी रवी शिसोदिया, अनु जैविक तज्ञ दुष्यंत करजगावकर, प्रयोगशाळा सहाय्यक निवास खूपसे, मुख्याध्यापक आळंदकर एन व्ही, विभाग प्रमुख शेंडगे बी.बी, सहशिक्षक संगेवार, भारती यांनी विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा भेट आणि मार्गदर्शनासाठी विशेष परिश्रम घेतले.

मराठी विभागातर्फे 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात संपन्न

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी



सोयगाव,दि.१५ ऑक्टोबर

भारताचे माजी राष्ट्रपती,थोर शास्त्रज्ञ आणि युवा पिढीचे प्रेरणास्थान भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालय,सोयगाव येथील मराठी विभागाच्या वतीने 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ.रामेश्वर मगर,डॉ.शंतनू चव्हाण यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.रमेश औताडे यांनी प्रास्ताविकातून वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व स्पष्ट केले.त्यांनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा आणि वाचनप्रेमाचा परिचय करून देत विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय जोपासावी,असे आवाहन केले.

प्रमुख व्याख्याते डॉ.रामेश्वर मगर यांनी वाचन हे ज्ञानप्राप्तीचे प्रभावी साधन असल्याचे सांगितले.वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा मिळते,कल्पनाशक्ती विकसित होते आणि व्यक्तिमत्त्व समृद्ध होते,असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे साहित्य वाचून आपली ज्ञानकक्षा रुंदावावी, असे आवाहन त्यांनी केले.

रुंदावावी,असे आवाहन त्यांनी केले.

डॉ.शंतनू चव्हाण यांनी वाचनातून संवेदनशीलता,विवेक आणि चिकित्सक विचारशक्ती विकसित होत असल्याचे सांगितले.डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापराच्या काळात पुस्तकवाचनाची सवय टिकवणे आवश्यक आहे,असे त्यांनी स्पष्ट केले.विद्यार्थ्यांनी दररोज काही वेळ वाचनासाठी देऊन ज्ञानसंस्कृती बळकट करावी,असे आवाहन त्यांनी केले.अध्यक्षीय समारोपात डॉ.रावसाहेब बारोटे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वाचन अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.वाचनामुळे ज्ञान, संस्कार आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो,असे त्यांनी सांगितले. महाविद्यालयात वाचनविषयक उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील,अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ.ज्योती स्वामी यांनी केले.

जिंतूरात काँग्रेसचे धरणे आंदोलन; शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाखांची मदत देण्याची मागणी



जिंतूर : परभणी जिल्ह्यासह जिंतूर तालुक्यात यंदा १९७२ पेक्षाही भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याचा दावा करत शेतकऱ्यांना सरसकट प्रति हेक्टर एक लाख रुपये आर्थिक मदत तातडीने मंजूर करावी, तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, या मागण्यांसाठी काँग्रेसच्या वतीने बुधवारी (दि. १५) जिंतूर तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

यंदाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, पिकांचे उत्पादन घटल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन सरसकट हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत देऊन दिलासा द्यावा आणि त्यांच्या प्रश्नांवर शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी भूमिका काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी मांडली. यासोबतच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली.

या आंदोलनात काँग्रेसचे तालुकाध्यक्ष केशवराव बुधवंत, शहराध्यक्ष फिरोज भाई, नगरसेवक इस्माईल पैलवान, वसीम पठाण, प्रदीप देशमुख, अनिल गाडेकर, यादवराव थिटे, मकसूद पठाण, अनिल वजीर, शेख जावेद, मोहसीन खान, भगवानराव बुधवंत, अंकुश राठोड यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनानंतर काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर करण्यात आले. त्यानंतर धरणे आंदोलनाची सांगता झाली.

अखेर 6 वर्षांनी पुन्हा एकदा रत्नाकर म्हात्रे यांच्या बाजूने निकाल

जसखार ग्रामपंचायत सदस्य हेमंत ठाकूर यांचे सदस्य पद रद्द

उरण दि १५(विठ्ठल ममताबादे)दि.२४/०९/२०२६ रोजी ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिलेल्या निर्णयानुसार रत्नाकर म्हात्रे (रा. जसखार) यांच्या बाजूने निर्णय देत हेमंत ठाकूर ग्रामपंचायत जसखार मु. जसखार ता. उरण येथील सदस्य म्हणून राहण्यास अनार्ह्य ठरविले आहे. आज पासून ६ वर्ष अगोदर रत्नाकर म्हात्रे यांनी जसखार ग्रामपंच्यात सदस्य हेमंत ठाकूर यांच्या विरोधात गावातील सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केल्याबद्दल जिल्हाधिकारी रायगड समवेत इतर शासकीय ठिकाणी तक्रार केली होती हीच तक्रार अखेर मान्य करत जिल्हाधिकारी ठाणे यांनी रत्नाकर म्हात्रे यांच्या बाजूने निकाल देत हेमंत ठाकूर यांचे सदस्य पद रद्द केले.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील कृष्णा खंडेलवाल यांने प्रथम तर श्रद्धा गायकवाड यांचे यश

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.१५ ऑक्टोबर

येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय,सोयगाव येथील १२ वी विज्ञान शाखेचे विद्यार्थी कृष्णा खंडेलवाल याने जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग (इनलाईन) स्पर्धेत प्रथम क्रमांक (सुवर्णपदक)पटकावून एक मोठी कामगिरी केली आहे. तसेच १२ वी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी श्रद्धा गायकवाड हिने जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग (इनलाईन) स्पर्धेत द्वितीय क्रमांक (रौप्यपदक) पटकावून एक मोठी कामगिरी केली. आहे.या दमदार कामगिरीसह दोघांची विभागस्तरीय (Division Level) स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल सर्व खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार,उपराचार्य डॉ.रावसाहेब बारोटे तसेच कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील यांनी अभिनंदन केले. तसेच खेळाडूंना मार्गदर्शन डॉ.निलेश गाडेकर,प्रा.शेख तौफिक यांनी केले.त्यांच्या कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले परभणी जिल्हा दौऱ्यावर

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी: केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले हे दि. १७ ऑक्टोबर रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, या दौऱ्यात ते जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करणार आहेत. श्री. आठवले यांच्या दौऱ्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे. दि. १७ ऑक्टोबर रोजी आळणी, जि. धाराशिव येथून वाहनाने त्यांचे दु. २ वाजता सेलू तालुक्यातील हतनूर येथे आगमन होईल. या ठिकाणी ते दुष्काळ सदृश्य परिस्थितीची पाहणी करणार आहेत. दुपारी २.४५ वाजता वालूर, ता. सेलू येथे दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करतील. दुपारी ३.१५ वाजता परभणी येथील हॉटेल फर्न येथे आगमन व राखीव. त्यानंतर सायंकाळी ४.३० वाजता गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगाव येथे ते दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करणार आहेत. पाहणीनंतर ते अहमदपूर, जि. लातूरकडे वाहनाने जाणार आहेत.

जिल्हा जलसंधारण अधिकारी देविदास केंधळे यांचे लोकश्रेय च्या वतीने स्वागत

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी ** जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद्ध व जलसंधारण विभागा चे कार्यकारी अभियंता देविदास वि केंधळे यांनी नुकताच पदभार स्वीकारल्याने लोकश्रेय मित्र मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात आले स्वागत करता वेळी लोकश्रेय मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सलीम इनामदार जिल्हा मजूर फेडरेशनचे अध्यक्ष अब्दुल आजीज उर्फ सगरु भाई यांनी केले

पदवीधरांच्या न्याय हक्कासाठी डॉक्टर प्रताप सिंह पाटील यांना विजयी करा : जयसिंगराव गायकवाड



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी : माजी केंद्रीय मंत्री जयसिंगराव गायकवाड पाटील यांची आज काटशेवरी फाटा येथे पदवीधर मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व काँग्रेसचे अधिकृत उमेदवार यांच्या प्रचारार्थ पदवीधरांची बैठक घेऊन येत्या 23 तारखेला पहिल्या पसंतीचे मतदान करू निवडणुकीत विजय करा असे आवाहन माजी मंत्री जयसिंगराव (काका) गायकवाड पाटील यांनी केले यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अनिल पाटील नलावडे जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाऊ श्रीखंडे खुलताबाद पंचायत समितीचे माजी सभापती सुरेश चव्हाण ज्येष्ठ नेते पुंजा अण्णा नालावडे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष दीपक खोसरे सामाजिक कार्यकर्ते तथा पदवीधर संजय जाधव वाल्मीक आदाने पाटील आथर पटेल रियाज शेख यांच्यासह तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते

बारवा इतिहासासोबतच जलसमृद्धीचा अमूल्य ठेवा - बारव अभ्यासक रोहन काळे

ऐतिहासिक वारसा जतन करण्याचे आवाहन, परभणीत वारसादूतांची राज्यातील पहिली कार्यशाळा

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: यंदा पर्जन्यमान कमी झाल्यामुळे महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी प्राचीन जलस्रोत असलेल्या बारवांचे पुनरुज्जीवन महत्त्वपूर्ण ठरू शकते. आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेल्या या जलसंवर्धनाच्या अनमोल वारशाचे जतन आणि संवर्धन करण्याची गरज असून, बारवांकडे केवळ ऐतिहासिक वास्तू म्हणून नव्हे, तर पाण्याचे महत्त्वपूर्ण स्रोत म्हणून पाहिले पाहिजेत. त्यामुळे बारवा या इतिहासासोबतच जलसमृद्धीचा अमूल्य ठेवा असल्याचे प्रतिपादन बारव अभ्यासक रोहन काळे यांनी केले.

परभणी येथे आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात दोन दिवशीय आयोजित वारसादूतांच्या कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले.

यावेळी बारव अभ्यासक रोहन काळे, जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे, नायब तहसीलदार प्रमोद वाकोडकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पवन खांडके, आयटीआयचे प्राचार्य विकास आडे, मल्हारीकांत देशमुख यांच्यासह संबंधित अधिकारी, अभ्यासक आणि वारसादूत उपस्थित होते.

ग्रामीण भागातील ऐतिहासिक वारशाचे संवर्धन आणि बारवांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित ही वारसादुतांची दोन दिवशीय महाराष्ट्रातील पहिली कार्यशाळा असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी सांगितले. तसेच दोन दिवस चालणाऱ्या कार्यशाळेमागील पार्श्वभूमी सांगताना जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात राज्यातील विविध गड-किल्ल्याचे छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले असून, जिल्ह्यातील गड-किल्लेप्रेमींनी या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनासाठी पुढाकार घेणाऱ्या उपस्थितांचे अभिनंदन केले. बारवांच्या माध्यमातून जिल्ह्यातील ऐतिहासिक व पुरातत्त्वीय परंपरेचा वारसा जनतेपर्यंत पोहोचविणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले. बारवांविषयीची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या संवर्धनासाठी लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात येणार असल्याचेही त्या म्हणाल्या.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

घाटीत राज्यातील पहिले स्वतंत्र 'मधु स्नेह' क्लिनिक सुरु

टाईप-1 मधुमेहग्रस्त बालकांसाठी नियमित फॉलो-अप सेवा; दर शुक्रवारी मिळणार उपचार व मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : टाईप-१ मधुमेह असलेल्या बालकांना नियमित वैद्यकीय देखरेख, उपचार आणि योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील बालरोग चिकित्सा विभाग आणि उडाण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'मधु स्नेह' या विशेष फॉलो-अप क्लिनिकची सुरुवात करण्यात आली. गुरुवारी (दि. १५) घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते या क्लिनिकचे उद्घाटन झाले. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात टाईप-१ मधुमेहग्रस्त बालकांसाठी सुरू झालेले हे पहिले स्वतंत्र नियमित फॉलो-अप क्लिनिक असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे.



या क्लिनिकमध्ये बालकांचे नियमित आरोग्य परीक्षण, रक्तातील साखरेची तपासणी, इन्सुलिन व्यवस्थापन, आहारविषयक मार्गदर्शन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि मानसिक आधार अशा सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. बालकांसह त्यांच्या पालकांना मधुमेहाचे योग्य व्यवस्थापन करता यावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि जीवनमान सुधारावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी बालकांच्या आरोग्यासाठी योग्य उपचार, शिक्षण आणि मार्गदर्शनाला वैद्यकीय क्षेत्रात प्राधान्य दिले जात असल्याचे सांगितले. उडाणसारख्या संस्थांच्या सहकार्यामुळे आरोग्यसेवा अधिक सक्षम होण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

या वेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, उपअधिष्ठाता डॉ. विनोद मुंदडा, बालरोग विभागप्रमुख डॉ. प्रभा खैरे, उडाण संस्थेच्या संस्थापिका डॉ. अर्चना सारडा, विश्वस्त डॉ. संपत सारडा, डॉ. सैफुद्दीन अब्बास आणि कुंदन रॉय उपस्थित होते.

'मधु स्नेह' क्लिनिक दर शुक्रवारी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत बालरोग बाह्यरुग्ण विभागातील पहिल्या मजल्यावरील ओपीडी क्रमांक १३३ येथे सुरू राहणार आहे. सहयोगी प्राध्यापक डॉ. तृप्ती जोशी आणि डॉ. अर्चना सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली ही सेवा दिली जाणार आहे.

यावेळी टाईप-१ मधुमेहग्रस्त बालकाच्या पालक नसीमा शेख यांनी अनुभव मांडताना बालकांचे संगोपन करताना येणाऱ्या अडचणी आणि नियमित वैद्यकीय देखरेखीसह पालकांना योग्य मार्गदर्शन मिळण्याचे महत्त्व स्पष्ट केले. बालरोग विभागातील प्राध्यापक, पदव्युत्तर विद्यार्थी, आंतरवासिता प्रशिक्षणार्थी, परिचारिका निर्मला शिंदे, स्वाती खंडारे आणि उडाण संस्थेच्या टीमने या उपक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले.

टाईप-१ मधुमेह असलेल्या बालकांच्या पालकांनी या विशेष आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. प्रभा खैरे आणि उडाण संस्थेतर्फे करण्यात आले.

ज्ञान संदीप विद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून उत्साहात साजरी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

ज्ञान संदीप शिक्षण संस्था, डॉ. आंबेडकर नगर संचलित ज्ञान संदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मिसरवाडी येथे भारताचे माजी राष्ट्रपती तथा 'मिसाईल मॅन' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून अत्यंत उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि ज्ञानाची जिज्ञासा वाढीस लागावी, असा मोलाचा संदेश देण्यात आला.



सदर कार्यक्रमाला ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांची विशेष उपस्थिती लाभली होती, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अभिजीत सोनवणे हे होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या विशेष प्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या उत्तुंग व प्रेरणादायी जीवनप्रवासावर मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषांमध्ये आपली मनोगते व्यक्त केली. डॉ. कलाम यांचे शैक्षणिक, वैज्ञानिक आणि राष्ट्रउभारणीतील अद्वितीय योगदान विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांतून अत्यंत प्रभावीपणे मांडले. डॉ. कलाम यांच्या जीवन संघर्षातून धडा घेत विद्यार्थ्यांनी नियमित वाचन करावे, ज्ञानाची आस बाळगावी आणि मोठी स्वप्ने पाहून ती सत्यात उतरवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असा प्रेरणादायी विचार या वेळी विद्यार्थ्यांना देण्यात आला.

हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्राथमिक पदवीधर शिक्षिका श्रीमती वैशाली बोरुडे यांच्यासह अजयकुमार खिल्लारे, आनंद सातदिवे, विजय आघाव, नय्युम शेख, गौतम मकासरे, हर्षला खिल्लारे आणि तायरा पठाण यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे अत्यंत ओघवते व सुटसुटीत सूत्रसंचालन आनंद सातदिवे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गौतम मकासरे यांनी मानले.

जिल्हा परिषदेत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेत त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.



जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात वित्त विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे होते. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., अर्थ व बांधकाम सभापती सचिन गरड, समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रसाद जटाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मंगल पांचाळ, सहाय्यक संचालक (ग्रंथालय) सुनील हुसे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. संजय गायकवाड यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्यांची साधी राहणी, उच्च विचारसरणी, देशाप्रती असलेले प्रेम आणि राष्ट्राच्या विकासातील योगदान याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी डॉ. कलाम यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आणि राष्ट्राभिमानाचा उल्लेख केला.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी जपली जाते – भास्कर आबा दानवे

सेवा संकल्प अभियानांतर्गत जुना जालना येथे चित्रकला स्पर्धा; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

जालना : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या सेवा संकल्प अभियानांतर्गत जुना जालना येथील रामचंद्र किनगावकर प्राथमिक विद्यालय आणि बाबुराव जाफराबादकर माध्यमिक विद्यालयात गुरुवारी (दि. १५) चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.



भाजपचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. हिंदू समाज संस्था संचलित या दोन्ही विद्यालयांमध्ये आयोजित स्पर्धेत विद्यार्थ्यांनी निसर्ग, सामाजिक विषय आणि दैनंदिन जीवनातील विविध पैलूंवर आधारित चित्रे रेखाटली. आपल्या कल्पकतेतून आणि रंगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध भावना व विचार प्रभावीपणे मांडले.

यावेळी बोलताना भास्कर आबा दानवे म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष कलागुण दडलेले असतात. त्यांना योग्य व्यासपीठ, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते आपल्या कर्तृत्वाच्या बळावर वेगळी ओळख निर्माण करू शकतात. शिक्षणासोबतच कला, संस्कार आणि सामाजिक जाणीव यांनाही महत्त्व देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असून, सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्याला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपली सर्जनशीलता व्यक्त करण्याची संधी मिळाली. तसेच त्यांच्यात आत्मविश्वास, कल्पकता आणि सकारात्मक स्पर्धेची भावना विकसित होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासोबतच सामाजिक बांधिलकी आणि जनसहभागाचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या स्पर्धेचे आयोजन भाजपा जुना जालना मंडळाचे अध्यक्ष मोहन राऊत यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी नगरसेविका अनामिक पांगारकर, संस्थेचे उपाध्यक्ष रावसाहेबजी अवघड आप्पा, सचिव संजयजी देशपांडे, कोषाध्यक्ष जुगलकिशोरजी भक्कड, सदस्य भगवान धोत्रे, नितीन कोळेश्वर, जगदीश बडवे, विनायक दसरे आणि सहसचिव चंद्रशेखर वाघमारे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री साहेब, 5 हजार देऊन शेतकऱ्याची चेष्टा करण बंद करा :- काँग्रेस नेते भास्कर पोले नाईक

शेतकऱ्यांच्या लेकी-बाळी, नातवंडे घरी येतात; दिवाळी कशी साजरी करायची?

हिंगोली : राज्यातील शेतकरी कधी कोरड्या दुष्काळाने, तर कधी अतिवृष्टीमुळे होणाऱ्या नुकसानीने त्रस्त आहेत. शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, कापूस आणि सोयाबीनचे पीक हातचे गेल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत दिवाळी साजरी करण्यासाठी केवळ पाच हजार रुपये देण्याची घोषणा म्हणजे शेतकऱ्यांच्या अडचणींची जाणीव न ठेवणारी बाब असल्याची टीका जिल्हा काँग्रेस कमिटीचे ओबीसी विभागाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष भास्करराव पोले नाईक यांनी केली आहे.

"मुख्यमंत्री साहेब, तुम्हीच पाच हजार रुपयांत दिवाळी साजरी करून दाखवा. आम्ही शेतकरी तुम्हाला पाच हजार रुपये देतो; या रकमेत दिवाळीचा संपूर्ण खर्च भागवून दाखवा," असे खुले आव्हान पोले नाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

शेतकऱ्यांच्या घरात दिवाळीचा आनंद कसा येणार?

दिवाळी हा सण आनंदाचा, उत्साहाचा आणि कुटुंबीयांना एकत्र आणणारा सण आहे. या सणानिमित्त शेतकऱ्यांच्या लेकी-बाळी, जावई आणि नातवंडे माहेरी येतात. घरात गोडधोड केले जाते, नवीन कपडे घेतले जातात, फराळ आणि किराण्याची खरेदी केली जाते. मात्र, हातातील पीक वाया गेलेले असताना आणि आर्थिक परिस्थिती बिकट असताना शेतकऱ्यांनी हा सण साजरा कसा करायचा? आपल्या घरी आलेल्या लेकी-बाळींना आणि नातवंडांना काय खाऊ घालायचे? असा सवाल भास्करराव पोले नाईक यांनी उपस्थित केला आहे.



पाच हजार रुपयांत दिवाळीचा किराणाही होणार नाही!

शेतकऱ्यांना दुष्काळ आणि पीक नुकसानीच्या संकटातून सावरण्यासाठी ठोस आर्थिक मदतीची गरज आहे. अशा वेळी पाच हजार रुपयांच्या मदतीतून शेतकऱ्यांच्या सर्व समस्या सुटणार नाहीत. दिवाळीचा किराणा, फराळ, कपडे आणि इतर आवश्यक खर्च भागवतानाही शेतकऱ्यांची दमछाक होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने अधिक प्रभावी मदतीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी पोले नाईक यांनी केली.

"शेतकऱ्यांच्या शेतातील कापूस गेला, सोयाबीन गेले; उत्पन्नाचे साधनच संकटात आले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सन्मानाने दिवाळी साजरी करता यावी, यासाठी सरकारने त्यांच्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करावा. केवळ पाच हजार रुपये देऊन शेतकऱ्यांच्या अडचणी दूर होणार नाहीत," असेही ते म्हणाले.

काँग्रेसकडून मुख्यमंत्र्यांच्या घोषणेचा निषेध

शेतकऱ्यांना संकटाच्या काळात ठोस आर्थिक मदत आणि दिलासा देण्याची गरज असताना करण्यात आलेली पाच हजार रुपयांची घोषणा अपुरी असल्याची भूमिका भास्करराव पोले नाईक यांनी मांडली. या घोषणेचा काँग्रेस पक्षाच्या वतीने निषेध व्यक्त करत शेतकऱ्यांना पुरेशी आर्थिक मदत देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन सरकारने केवळ घोषणांवर न थांबता प्रत्यक्ष मदतीसाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमिटीचे ओबीसी विभागाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष भास्करराव पोले नाईक यांनी केली आहे.

तुळजाभवानी शुगर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

चेअरमन भावनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते मोळीपूजन; शेतकरी, कामगारांच्या प्रगतीची अपेक्षा

जिंतूर : आडगाव दराडे येथील श्री तुळजाभवानी शुगर प्रा. लि. साखर कारखान्याच्या मोळीपूजन व गळीत हंगामाचा शुभारंभ चेअरमन सौ. भावनाताई बोर्डीकर यांच्या शुभहस्ते आज उत्साहात संपन्न झाला. यावेळी सौ. मीनाताई बोर्डीकर, सचिन मुंगसे पाटील व सचिन गोरे यांची विशेष उपस्थिती होती.

या कार्यक्रमाला कारखान्याचे व्हाईस प्रेसिडेंट विवेक भारद्वाज, जनरल मॅनेजर विजय मते, वर्क्स मॅनेजर टोकलवाड, चीफ केमिस्ट कटियार, मुख्य शेतकी अधिकारी पाटील यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी व वाहतूक कंत्राटदार, कारखान्याचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सहकार क्षेत्र ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा

सहकार क्षेत्र हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, साखर कारखाने शेतकरी, कामगार आणि परिसराच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. यंदाचा गळीत हंगाम यशस्वीरीत्या पार पडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळावा, कामगारांच्या श्रमांना सन्मान मिळावा आणि कारखान्याची आर्थिक प्रगती अधिक वेगाने व्हावी, अशी अपेक्षा या शुभारंभाच्या निमित्ताने व्यक्त करण्यात आली.

मोळीपूजन व गळीत हंगामाच्या प्रारंभामुळे कारखाना परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी हंगाम शेतकरी, कामगार आणि कारखान्यासाठी लाभदायी ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

घ्या एक हात मदतीचा, सामाजिक बांधीलकीचा, शैक्षणिक क्रांतीचा " या उपक्रमास उन्नतनगर अक्षय को ऑप. हौसिंग सोसायटीच्या माध्यमातून अजयजी देशलेहरा यांच्या सहकार्याची भरघोस साथ

बोरघर, माणगांव : गोरेगाव मुंबई येथील उन्नतनगर - अक्षय को ऑप. हौसींग सोसायटी यांचे माध्यमातून, रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील हातोंड, कसईशेत, माठल, चंदरगांव येथील रा जि प शाळेतील मुलांना आणि माध्यमिक विद्यालय चंदरगांव येथील मुलांना मागील दोन महिन्यापूर्वी सायकल, पुस्तके, खाऊ वाटप करण्यात आले होते. या दरम्यान या सोसायटीचे चेअरमन - मा. कानमलजी देशलेहरा, आणि सहकारी मा. विवेकानंद सावंत, मनिष देशलेहरा यांनी येथील मुलांच्या समस्या जाणून घेतल्या होत्या, ही बाब त्यांनी सोसायटीच्या मान्यवर मंडळीपुढे व्यक्त केली आणि वयोमानाने आजारी असूनही या संस्थेचे सदस्य मा. अजयजी देशलेहरा यांनी आपल्या चिरंजीवास सांगितले की, बिकट परिस्थितीत शिक्षण घेत असलेल्या मुलांना आपण मदतीचा हात दिलाच पाहिजे.

यानुसार, कानमलजी देशलेहरा आणि विवेकानंदजी सावंत यांनी सुधागड तालुक्यातील हातोंड गावचे सुपुत्र मुंबई पोलीस हवालदार राजेंद्र वाघमारे यांचेशी संपर्क साधून या भागातील शिक्षित मुलांची वयोमानानुसार माहिती मागवून घेतली. रा जि प शाळा - महागाव, देऊळवाडी चंदरगांव, हातोंड, माठल, केलगान, गोंदाव, कसईशेत, पत्र्याची वाडी आणि माध्यमिक विद्यालय चंदरगांव येथील ऐकूण 358 मुलांना सँडल, दप्तर, व अन्य साहित्याचे वाटप राजेशजी अजय देशलेहरा यांच्या माध्यमातून करण्यात आले.



सर्वच शाळेतील मुलांनी आदरणीय दानशूर मान्यवरांचा यथोचित सन्मान करून स्वागत करण्यात आले, लहानग्या आणि आदिवासी व आर्थिक गरीब मुलांनी केलेले स्वागताचा हा क्षण चिरकाळ स्मरणात राहणारा ठरला. यावेळी मा. राजेशजी देशलेहरा म्हणाले की, आमच्या वडिलांनी आम्हांला लहानपणा पासून एक शिकवण दिली आहे की, " गरजवंताना मदतीचा हात द्या. गोरगरीब मुलांना शिक्षणासाठी केलेली मदत हीच खरी ईश्वर सेवा आहे ". तुम्ही मुलांनी तुमच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खुप शिका आणि आय ए एस, आय पि एस असे मोठे अधिकारी बना. यासाठी आम्ही तुम्हांला कायम मदत करत राहू. तसेच, सोसायटीचे चेअरमन - कानमल देशलेहरा, आणि विवेकानंदजी सावंत यांनी देखील आपले विचार व्यक्त करून मुलांना शक्य तितकी मदत करण्याचे आश्वासन दिले.

" द्या एक हात मदतीचा, सामाजिक बांधिलकीचा, शैक्षणिक क्रांतीचा " या उपक्रमाच्या माध्यमातून गेल्या 13 वर्षांपासुन अनेक दानशूर व्यक्ती व संघटना यांच्या माध्यमातून अखंडितपणे सेवाभावी कार्य करणारे, मुंबई पोलीस दलातील पोलीस हवालदार - राजेंद्र वाघमारे यांनी मा. अजयजी देशलेहरा यांचे विशेष ऋण व्यक्त केले. देव देवळात असतो की माणसाच्या हृदयात असतो याचा शोध घेतल्यास देव माणसाच्या हृदयात असतो हे मा. अजयजी देशलेहरा यांच्यासारख्या आदर्शवत व्यक्तीकडे पाहिल्यावर कळून येते. स्वतः वयोमानाने आजारी असूनही उच्च कोटीची दान प्रवृत्ती ही वंदनीय आहे. " जसा बाप तसा बेटा " ही मराठीमध्ये एक म्हण आहे या नुसार राजेशजी देशलेहरा हे आपल्या वडिलांच्या दिशादर्शक मार्गाने चालताना दिसत आहेत. मुलांना शिक्षणासाठी आपल्या गावाबाहेरील असे हे अपरिचित व्यक्ती मदत करत आहेत याची खुणगाठ मनात बांधून ठेवावी आणि खुप शिकून मोठे होऊन आपणही समाजातील अशा दुर्लक्षित दुर्गम आर्थिक गरिबी भोगत असणाऱ्या मुलांना शैक्षणिक दृष्ट्या मदतीचा हात देऊन, आज तुम्हांला जे मदत करत आहेत त्याचे कर्ज परतफेड करावे.

यावेळी, उन्नतनगर अक्षय को ऑप. हौसिंग सोसायटीचे मा. कानमलजी देशलेहरा, व विवेकानंद सावंत, मनिष देशलेहरा, राजेश देशलेहरा, मधुकर बनसोडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

तसेच, माध्यमिक विद्यालय - चंदरगांवचे, कृष्णा हेमाडे सर (मुख्याध्यापक), सहशिक्षक - आबा ठोंबरे सर, विजय शिंदे सर, सुनील घोगले सर, सदानंद कोलीस्ते सर... रा जि प शाळा - चंदरगांवचे, एस एम सी अध्यक्ष - सुनील घोगले, मुख्याध्यापक - मुकुंद भडवलकर, सहशिक्षक - श्वेता सरोदे मॅडम, प्रतिज्ञा भदेकर मॅडम, हेमा गिरी मॅडम, माजी विद्यार्थी संघ सचिव - दर्शन चव्हाण..... रा जि प शाळा - महागावचे, मुख्याध्यापिका - उर्मिला मिरजगावे मॅडम, सहशिक्षक - आश्रूजी वानखेडे सर, प्रिया कळमकर, अंगणवाडी मदतनीस - माडे ताई... रा जि प शाळा - देऊळवाडीचे सचिन कदम सर, रा जि प शाळा - हातोंड चे, मुख्याध्यापक - अंकुश काकरा सर, सहशिक्षिका - सिमा फुंदे मॅडम, रा जि प शाळा - माठल चे मुख्याध्यापक - इरवंत रचवार सर, सहशिक्षक - लहु जायभाऐ सर. रा जि प शाळा - केलगान चे मुख्याध्यापक - तुषार अडसूल सर, सहशिक्षक - गोकुळ गायकवाड सर. रा जि प शाळा - गोंदाव चे मुख्याध्यापक - देविदास जाधव सर, सहशिक्षक - संदीप देशमुख सर. रा जि प शाळा - कसईशेत चे मुख्याध्यापिका - रेखा पाटील मॅडम, सहशिक्षक - सचिन कदम सर. रा जि प शाळा - पत्र्याचीवाडी चे मुख्याध्यापक - संदीप म्हात्रे सर. यांनी शाळेच्या वतीने स्वागत, नियोजन,शिस्तप्रियता दर्शवून दानदाते व मान्यवर मंडळीचे आभार मानले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911